


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ४०१ शनिवार दि २७ जून २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# पाच तयार होते, सहावा खासदार ऐकेना!फडणवीसांनी कसं मन वळवलं? पडद्यामागे काय काय घडलं?

**वृत्तसंस्था-मुंबई**

शिवसेना उबाठाचे ६ खासदार फोडत उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना मोठा धक्का दिला. ठाकरेसेनेचे ९ पैकी ६ खासदार शिंदेसेनेच्या गळाला लागले. त्यांनी चारच दिवसांपूर्वी शिंदेसेनेत प्रवेश केला आणि ऑपरेशन टायगर पूर्ण झालं. या ऑपरेशनमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील महत्त्वाची भूमिका पार पाडल्याची माहिती समोर आली आहे. ङ्गऑपरेशन टायगरफ्वी मोहीम फत्ते करण्याकरिता आवश्यक खासदारांचं संख्याबळ पूर्ण करण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शिष्टाई मोलाची ठरल्याची सूत्रांची माहिती आहे. शिवसेना (ठाकरे गट) खासदार फोडाफोडीचं राजकारण रंगात आलं असताना पूर्णपणे मौन बाळगून असलेल्या मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सूचक विधान करत धक्का दिला होता. ऑपरेशन यशस्वी झाले आहे आणि रुग्ण एकदम सुदृढ आहे. त्यामुळे कोणीही काळजी करण्याची गरज नाही, असं म्हणत मुख्यमंत्री प्रथमच या सर्व घडामोडींवर उघडपणे व्यक्त झाले होते. कारण ऑपरेशन टायगरचे तर ठरले होते. परंतु त्यांना भाजपमध्ये घ्यायचे की शिवसेनेत हेच ठरत नसल्याने मुख्यमंत्र्यांनी या सगळ्याबाबत मौन बाळगले होते. विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यापासूनच खासदारांच्या प्रवेशाची चर्चा सुरू झाली होती. पण, जानेवारी, २०२६ मध्ये भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडून यावर गंभीरपणे विचार सुरू झाला. या आधी खासदार फोडण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी किमान पाच वेळा तरी भाजप श्रेष्ठींची भेट घेतली होती. परंतु, खासदारांना भाजपमध्ये प्रवेश द्यायचा की शिवसेनेत यावर निर्णय होत नव्हता. बहुतांश खासदारांची हाती कमळ धरण्याची इच्छा होती, मात्र खासदारांना शिवसेनेतच प्रवेश दिला गेला पाहिजे, अशी भूमिका देवेंद्र फडणवीस यांनी घेतल्याची खात्रीलायक सूत्रांची माहिती आहे. याकरिता केंद्रीय नेतृत्वाबरोबर फडणवीस यांच्या बैठकाही झाल्या. शिवसेनेत प्रवेश द्यायचा की भाजपमध्ये यावर काथ्याकूट झाल्यानंतर एप्रिलमध्ये ङ्गऑपरेशन टायगरफ्साठी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने एकनाथ शिंदे यांना हिरवा कंदील दाखवला. पाच खासदारांना आपल्याकडे वळवण्यात शिंदे यांना यश आलं. त्यावेळी प. बंगालमध्ये तृणमूलचे आमदार-खासदार फोडफोडीचे राजकारण ऐन भरात होते. भाजप केंद्रीय नेतृत्वाकडून फडणवीस यांच्याकडे विचारणा होऊ लागली. परंतु खासदारांचं संख्याबळ पाचच्या पुढे जात नव्हतं. अखेर ही जबाबदारी फडणवीस यांच्याकडे देण्यात आली. मुख्यमंत्र्यांनी सहाव्या खासदाराशी संपर्क साधून त्याचं मन वळवलं. त्याच्या राजकीय



कारकिर्दीची जबाबदारी घेण्याचा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला आणि हा तिढा सुटला. जुनच्या दुसऱ्या आठवड्यात सूत्रं वेगाने हलली आणि ङ्गऑपरेशन टायगरफ पूर्णत्वाला गेलं. सहा खासदारांनी दिल्ली गाठत लोकसभा अध्यक्षांना पत्र देत ठाकरे गटाला शेवटचा दणका दिला. यानंतर २१ जूनला त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

---

# पत्रकारांना शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या खासदार संजय दिना पाटील यांच्यावर पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हे दाखल करा

**जनसंचलन-बुलढाणा**

मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांनी इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या पत्रकारांना जाहीरपणे शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे.या घटनेचे तीव्र पडसाद संपूर्ण राज्यात उमटत असून, बुलढाणा जिल्हा मराठी पत्रकार संघ,डिजिटल मीडिया परिषद च्या वतीने या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. याप्रकरणी खासदार पाटील यांच्यावर ङ्गपत्रकार संरक्षण कायद्याफ्अंतर्गत तातडीने गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी करणारे निवेदन आज दि २६ जून २०२६ रोजी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्यामार्फत राज्याचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना पाठवण्यात आले. मुख्यमंत्र्यांना सादर केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,पत्रकार हा समाजाचा आरसा असून, प्रशासन, कायदेव्यवस्था आणि न्यायपालिका यांना जोडणारा दुवा आहे. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकारितेवर आणि लोकहितार्थ आवाज उठवणाऱ्या पत्रकारांवर गेल्या काही काळापासून सातत्याने हल्ले, मारहाण आणि शिवीगाळीचे प्रकार वाढत आहेत. नुकत्याच घडलेल्या एका घटनेत, खासदार संजय दिना पाटील यांनी इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या पत्रकारांना अत्यंत अश्लील भाषेत शिवीगाळ केली असून, त्यांच्या आई-बहिणींवरून अक्षेपार्ह वक्तव्ये केली.एवढेच नव्हे तर पत्रकारांना थेट जीवे मारण्याची धमकीही दिली.लोकसभेच्या एका जबाबदार आणि विद्यमान खासदाराकडून अशा प्रकारचे असंविधानिक, उद्धट आणि बेजबाबदार वर्तन घडणे अत्यंत अनपेक्षित आणि निंदनीय आहे, असे पत्रकार संघाने म्हटले आहे.या घटनेमुळे राज्यातील पत्रकार वर्गात तीव्र संतापाची लाट पसरली आहे. पत्रकारितेची अस्मिता,अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि पत्रकारांच्या सुरक्षेला घातकी ठरणारी ही प्रवृत्ती समाजात वाढू नये,यासाठी खासदार संजय दिना पाटील यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी आग्रही मागणी बुलढाणा जिल्हा मराठी पत्रकार संघ तसेच डिजिटल मीडिया परिषद संघटनांनी केली आहे.



खासदार पाटील यांच्यावर त्वरित कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही पत्रकारांच्या वतीने देण्यात आला आहे. निवेदन देताना मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रणजीत सिंग राजपूत, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे समन्वयक राजेश डिडोळकर,प्रदेश प्रतिनिधी गणेश निकम, डिजिटल मीडिया परिषद चे विभागीय सचिव जितेंद्र कायस्थ, डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष गणेश सोळंकी,नितीन शिरसाट,विजय देशमुख,संजय जाधव, विलास खंडेराव,सुरेखाताई सावळे, दीपक मोरे,सुनील मोरे, अजय राजगुरे, प्रशांत सपकाळ, अभिषेक वरपे,अजय काकडे,राहूल चव्हाण,रेहमत अली,शेख असिफ आदी पत्रकार या ठिकाणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेमबाजीतील द्रोणाचार्य



भरून न येणारे नुकसान...फएकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदकांची कमाई करणारी नेमबाज मनू भाकर हिचे प्रशिक्षक अन् माजी नेमबाज जसपाल राणा यांच्या अकाली निधनानंतरची प्रतिक्रिया खूप काही सांगून जाते. मनूची एकाच ऑलिम्पिकमधील दुहेरी पदकांची कामगिरी साधी, सोपी नव्हे. यासाठी द्रोणाचार्यांसारखा करडा, आपल्या शिष्याची नस अचूक ओळखणारा प्रशिक्षक हवा. जसपाल म्हणजे या साऱ्यांची व्याख्याच होते. १९९४च्या राष्ट्रकुल आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील २५ मीटर पिस्तूलमध्ये पटकावलेले सुवर्णपदक हे त्यांचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील पहिले मोठे यश होते. त्यामुळे १९७८मधील राजा रणधीर सिंह यांच्या आशियाई सुवर्ण पदकानंतर (१६ वर्षांनी) भारताला पहिले सुवर्ण लाभले. जसपाल यांनी कारकिर्दीतील सर्वोच्च क्षण २००६च्या दोहा एशियाडमध्ये अनुभवले. तीन सुवर्णपदके, एक रौप्यपदक अशी कामगिरी करताना तत्कालीन विश्वविक्रमाशी बरोबरी करून त्यांनी देशाचे नाव उंचावले. जसपाल राणा यांनी आपल्या राष्ट्रकुल कारकिर्दीत १५पदके पटकावली, ज्यामध्ये नऊ सुवर्णपदकांचाही समावेश आहे. यशस्वी नेमबाज म्हणून समृद्ध कारकीर्द घडविल्यानंतर भावी पिढी घडविण्याचा ध्यास जसपाल यांनी घेतला. त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय मोकळेढाकळे आणि स्वभाव रोखठोक. खेळाप्रति आदर अन् कळकळ वाटत असल्याने त्यांनी खेळाडू आणि प्रसंगी प्रशासकांनाही जरूर तिथे सुनावले. प्रसंगी मनूलाही सुनावले. दोघांमध्ये रुसवाही आला; पण त्यातील अहंकार हरला अन् ही गुरू-शिष्येची जोडी पुन्हा एकत्र आली. त्यानंतर पॅरिस ऑलिम्पिकमध्ये जे काही घडले ते भारतासह जागतिक क्रीडाविश्वाने अनुभवले. मनूसह सौरभ चौधरी, अनीश भानवाला आणि चिंकी यादव यांच्यासारख्या नेमबाजांना जसपाल यांनी मार्गदर्शन केले. जसपाल यांचे खेळातील योगदान तसेच त्यांनी नेमबाजांच्या पुढील पिढीला घडवण्यासाठी घेतलेली मेहनत बघून सरकारने त्यांना २०२०मध्ये ङ्गद्रोणाचार्य पुरस्काराफ्ने सन्मानित केले होते. जसपाल यांना श्रद्धांजली.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ॲमेझॉनला महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या मोठ्या संधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँड्री जेसी यांची मुख्यमंत्र्यांशी भेट

**मुंबई/वृत्तसंस्था**

'डेटा सेंटर्स' क्षेत्रात महाराष्ट्र ही देशाची राजधानी आहे. डेटा सेंटरचा विस्तार आणि विकासासाठी राज्यात उत्तम परिसंस्था निर्माण करण्यात येत आहे. केवळ डेटा सेंटर्स नाही, तर राज्यात आरोग्य, तंत्रज्ञान विषयक पायाभूत सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कौशल्य विकास यामध्ये मोठ्या गुंतवणुकीच्या संधी आहेत. त्यामुळे ॲमेझॉनने राज्यामध्ये गुंतवणूक करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



हॉटेल ताज पॅलेस येथे ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँड्री जेसी यांच्या समवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील गुंतवणुकीच्या संधीवर चर्चा केली. यावेळी मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बळगन, विकास आयुक्त (उद्योग) कादंबरी बलकवडे, ॲमेझॉन एडब्ल्यूएसचे कंट्री हेड संदीप दत्ता, ॲमेझॉन ग्लोबलचे कंट्री हेड समीर कुमार, एडब्ल्यूएसचे पब्लिक पॉलिसी संचालक विक्रम श्रीधरन, ग्लोबल ॲमेझॉनचे उपाध्यक्ष धर्मेश मेहता उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने देशातील अग्रणी राज्य आहे राज्याची अर्थव्यवस्था ६६० अब्ज डॉलर्स इतकी आहे. राज्याने २०३०पर्यंत ' वन ट्रिलियन डॉलर' अर्थव्यवस्था होण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यापैकी अर्धे अधिक उद्दिष्ट राज्याने पार केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगावर आधारित विविध प्रयोग राज्याच्या शासन व्यवस्थेमध्ये करण्यात येत आहे. त्यामुळे निश्चितच नागरिकांना सुलभ आणि सहजरित्या शासकीय सेवांचा लाभ देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. कृषी, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित व्यवस्थांची उभारणी करण्यात येत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगाने रोजगाराच्या स्वरुपामध्ये बदल होत आहेत. त्यामुळे या तंत्रज्ञानावर आधारित कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्र कौशल्य विकासामध्ये ॲमेझॉनसोबत काम करण्यास इच्छुक आहे. यासोबतच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमध्ये महाराष्ट्र देशात अव्वल आहे. या क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगावर आधारित कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात महाराष्ट्रात आवश्यक असलेली परिसंस्था विकसित करण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे डेटा सेंटर विकसित करण्यासाठी देण्यात येणाऱ्या सुविधांचा विस्तार करीत आहे. तसेच 'सार्वजनिक क्लाउड धोरण' लागू करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे. यामध्ये यापूर्वीच ॲमेझॉनसोबत शासनाने पब्लिक क्लाऊडमध्ये काम केले आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी राज्याने स्वतःची डेटा सेंटर धोरण जाहीर केले आहे. ज्यामध्ये ' ग्रीन डेटा सेंटर' चा समावेश आहे. डेटा सेंटरसाठी पारंपारिक ऊर्जेच्या उपयोगाऐवजी अपारंपारिक क्षेत्रातून ऊर्जेचा उपयोग करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. ग्रीन डाटा सेंटरसाठी राज्याने सवलतीपण दिल्या आहेत.

नवी मुंबई येथे मेडिसिटी उभारण्यात येत आहे. या ठिकाणी संपूर्ण उपचार पद्धतीची साखळीच निर्माण करण्यात येणार आहे.

## मुंढेच्या बदलीसाठी २५० कोटी गोळा

**मुंबई/वृत्तसंस्था**

अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांची बदली करण्यासाठी औषध कंपन्यांनी २५० कोटी रुपये गोळा केल्याचा दावा राष्ट्रवादीचे (शरद पवार) जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत केला.

लक्षवेधी सूचनेद्वारे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारभारातील त्रुटींवर सदस्यांनी प्रश्न उपस्थितीत केले. या वेळी बोलताना आव्हाड यांनी खळबळ जनक आरोप केला.

तुकाराम मुंढे चांगले काम करीत आहेत. भेसळखोरांवर कठोर कारवाई केली जात आहे. त्यांच्या कारवाईचा औषध कंपन्यांनी धसका घेतला आहे. जागतिक औषध कंपन्या त्यांच्या विरोधात एकवटल्या आहेत. त्यांनी मुंढे यांची बदल करण्यासाठी २५० कोटी रुपये जमा केले आहेत. त्यांच्या जीवाला धोका निर्माण



झाला आहे. समाज माध्यमांवरून त्यांनी जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. त्यामुळे सरकारने तुकाराम मुंढे यांनी संरक्षण द्यावे. त्यांनी तीन वर्षे त्यांची बदली करू नका, अशी मागणी आव्हाडांसह सर्वच सदस्यांनी केली. दरम्यान, मुंढे यांच्या बदलीसाठी अजून तरी झिरवाळ प्रयत्नशील असल्याचे दिसत नाही, त्या बद्दल झिरवाळ यांचे आभार मानले पाहिजे, असेही आव्हाड म्हणाले. त्याला उत्तर देताना, मुंढे चांगले काम करत आहेत. त्यांना थांबवले जाणार नाही, त्यांची बदली केली जाणार नाही.

## एकनाथ शिंदेंनी केली संजय दिना पाटलांची पाठराखण

**परभणी/वृत्तसंस्था**

गेल्या काही दिवसांपूर्वीच शिवसेना (ठाकरे) पक्षामधून फुटून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केलेले खासदार संजय दिना पाटील यांनी आज पत्रकारांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. खासदार संजय दिना पाटील यांच्या या संदर्भातील वक्तव्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. संजय दिना पाटील यांच्या या वक्तव्यानंतर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.



या घटनेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील प्रतिक्रिया समोर आली आहे. खासदार संजय दिना पाटील यांचा पत्रकारांबद्दल असं बोलण्याचा कोणताही हेतू नव्हता, असं मला त्यांनी सांगितलं. पण तरीही मी त्यांना याबाबत पत्रकारांशी बोलून दिलगिरी व्यक्त करण्यास सांगितलं असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. "मी या सर्व प्रकरणाची सविस्तर माहिती घेतो आणि पुन्हा बोलतो. मात्र, मी आताच खासदार संजय दिना पाटील यांच्याशी बोललो. त्यांनी माझ्याकडे भावना व्यक्त केल्या की, पत्रकारांबद्दल चुकीचं वक्तव्य करण्याची माझी कोणतीही भावना नव्हती. माझे आणि पत्रकारांचे संबंध चांगले आहेत. पत्रकारांच्या भावना दुखावण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता, असं मला संजय दिना पाटील यांनी सांगितलं आहे", असं स्पष्टीकरण एकनाथ शिंदे यांनी दिलं आहे.

"जे दररोज त्यांच्या विरोधात बोलतात, रोज त्यांच्याबाबत अपशब्द बोलतात. तोडून टाका, मारून टाका, तुडवा, अशा पद्धतीने खालच्या दर्जाचे जे शब्द वापरतात, मग तो देखील मीडियाचा अपमान आहे. किती दिवसांपासून काय-काय बोलतात ते आपण पाहिलं आहे. याचाच राग संजय दिना पाटील यांच्या मानामध्ये आहे. मात्र, पत्रकारांच्या बाबतीत संजय दिना पाटील यांच्या मनामध्ये कुठलाही राग नव्हता. पत्रकारांच्या बाबतीत अशा प्रकारचं वक्तव्य कोणत्याही लोकप्रतिनिधीने करू नये. त्यामुळे मी त्यांना सांगितलं की तुमच्याकडून जर पत्रकारांना काही शब्द गेले असतील तर पत्रकारांशी बोलून दिलगिरी व्यक्त करावी", असा सल्ला एकनाथ शिंदे यांनी संजय दिना पाटील यांना दिला आहे.

## 'मध्यभारताच्या विकासाचे इंजिन म्हणून नागपूर विमानतळ नावारूपाला येणार'

**नागपूर/वृत्तसंस्था**

नागपूर व परिसरात मेन्टेनन्स कमांड, ऑटो एव्हिएशन आणि डिफेन्स एव्हिएशन मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात मोठी गुंतवणूक होत आहे. या उद्योगांसह कृषी, पर्यटन आदींच्या विकासाला गती मिळून डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर विमानतळ हे नागपूर, विदर्भ आणि मध्य भारतातील आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून नावारूपाला येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

नागरी विमान वाहतूक मंत्री किंजारापू राममोहन नायडू, केंद्रीय रस्ते विकास व महामार्गमंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर विमानतळ परिसरात आयोजित विमानतळ हस्तांतरण सोहळयात ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देशात नवनवीन विमानतळ उभारले जात असताना नागपूर विमानतळ



मोठे व सुंदर करण्याचा आम्ही संकल्प केला. २०१८ मध्ये यासंदर्भात निविदा काढण्यात आल्या. २०१९ मध्ये जीएमआर कंपनी पात्र ठरली होती. मात्र या संदर्भात उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या आणि अखेर सकारात्मक निर्णय आला. केंद्राकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकल्पाला पूर्ण पाठिंबा दिला व केंद्रीय मंत्रिमंडळाने या प्रकल्पास मंजुरी दिली आणि आज रीतसरपणे या विमानतळाच्या आधुनिकीकरण, विस्तार आणि विकासाच्यादृष्टीने जीएमआर कंपनीला विमानतळ हस्तांतरण करण्यात आले आहे. या विमानतळावर प्रवासी व कार्गो वाहतूक होण्यासाठी दोन टर्मिनल आणि दोन धावपट्ट्या होणे गरजेचे आहे. हस्तांतरणांमुळे आता हा मार्ग मोकळा झाला आहे. या विमानतळाला मेट्रो ट्रेन आणि रस्त्यांची उत्तम कनेक्टिव्हिटी देण्यात आली आहे. विमानतळाचा विस्तार लक्षात घेऊन येत्या काळात सुयोग्य कनेक्टिव्हिटी देण्याच्या दिशेनेही समांतर कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

येत्या एक वर्षात या विमानतळावर येणाऱ्या प्रवाशाला येथील सौंदर्य आणि सुविधेत अभूतपूर्व बदल दिसावा असे काम व्हावे. तसेच २०२९ पर्यंत या विमानतळाचे काम पूर्ण करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. राज्य शासनाकडून मिहान आणि एमआयडीसी अंतर्गत जागा उपलब्ध करून देण्यात येईल व आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. नागपूर व परिसर आणि विदर्भात होत असलेला उद्योग क्षेत्राचा विकास शेजारील तेलंगणा, छत्तीसगड व मध्यप्रदेश या राज्यांनाही मोठा फायदा होऊन या भागाच्या आर्थिक विकासासाठी हे विमानतळ महत्त्वपूर्ण ठरेल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

# सातबारा उताऱ्यावरील नोंदीसाठी पैशांची मागणी; 10 हजारांची लाच घेताना महिला तलाठीला रंगेहात पकडलं

**नाशिक/वृत्तसंस्था**




राज्यात बोगस तलाठी भरतीचा पर्दाफाश झाल्याने खळबळ उडाली असताना नाशिकमध्ये सटाणा येथे एका भ्रष्टाचार तलाठी अधिकाऱ्याला रंगेहात पकडण्यात आलं आहे. सातबारा उताऱ्यावरील कर्जाचा बोजा कमी करणे आणि वारस नोंदीत कागदपत्रानुसार नावात दुरुस्ती करण्यासाठी लाच मागणाऱ्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे.

मनिषा नारायण बावीस्कर (३६, रा. साठफुटी रोड, पाठक मैदान, सटाणा) असे या संशयित ग्राम महसूल अधिकारीचे (तलाठी) नाव आहे. सटाणा तालुक्यातील ब्राह्मणगाव येथे त्या कार्यरत आहेत. मौजे ब्राह्मणगाव येथील एका शेतकऱ्यानं त्यांच्याविरोधात तक्रार केली होती. तक्रारदाराची शेत गट क्रमांक ८२४ मध्ये जमीन आहे, त्यावर भाऊसाहेब हिरे विविध कार्यकारी सेवा संस्था सोसायटीचे ४ लाख रुपयांचा चढविलेला बोजा कर्ज माफ करण्यात आले होता. परंतु हा बोजा सातबारा उताऱ्यावरून कमी झालेला नव्हता. यासह शेत गट क्रमांक ८२४ वर वारस नोंदीच्या वेळी त्यांचे नाव वेगळे नमूद केले होते. त्यांचे नाव कागदपत्रावरील नावाप्रमाणे बदलण्यात यावे यासाठी तक्रारदाराने अर्ज दिला होता.

या दोन्ही कामांसाठी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) मनिषा बावीस्कर यांनी स्वतःसह मंडळ अधिकारी यांच्यासाठी १० हजार रुपयांची लाच मागितली होती. याप्रकरणी संबंधित शेतकऱ्यानं लाचलुचपत प्रतिबंधक नाशिक कार्यालयात तक्रार केली होती. त्यानंतर २७ एप्रिल २०२६ रोजी तक्रारदार आणि पंच यांनी मनिषा बावीस्कर यांची सटाणा येथील मराठा हायस्कूल येथे जनगणना प्रशिक्षणादरम्यान तसेच प्रशिक्षणानंतर सटाणा तहसीलदार कार्यालयात भेट घेतली. तेव्हा संशयित मनिषा बावीस्कर यांनी उपरोक्त कामांसाठी १० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. २८ एप्रिल २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) मनिषा बावीस्कर तसेच मंडळ अधिकारी यांची पडताळणी करण्यासाठी पंचांना पाठविले असता मूळ तक्रारदाराने आपल्या कामाबाबत विचारणा केली. मंडळ अधिकारी यांनी तक्रारदाराकडे लाचेची मागणी केली नाही. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने तहसीलदार कार्यालयात सापळा रचला. त्यावेळी सटाणा तहसीलदार कार्यालयात पंचांसमक्ष तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीच्या पथकाने तलाठी अधिकारी मनिषा बावीस्कर यांना रंगेहात पकडले. या प्रकरणी सटाणा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## कल्याणमध्ये गोळीबार, मध्यरात्री पोलिसांनी काढली आरोपींची धिंड

**कल्याण/वृत्तसंस्था**

कल्याण पूर्वेतील आत्मानगर परिसरात दोन गटांमधील जुना वाद पुन्हा एकदा उफाळून आल्याने वादाचे रूपांतर थेट गोळीबारात झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेत राहुल वर्मा नावाचा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी कोळशेवाडी पोलिसांनी तातडीने कारवाई करत चार आरोपींना ताब्यात घेतले आहे.

आत्मानगर परिसरात बिंदू आणि प्रेम गुंडा या दोन गटांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून वाद सुरू होता. किरकोळ कारणांवरून दोन्ही गटांमध्ये वारंवार वाद, हाणामारी आणि दहशतीच्या घटना घडत होत्या. स्थानिक नागरिकांमध्येही या वाढत्या तणावामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, शुक्रवारी उशिरा रात्री पावणे बारा वाजण्याच्या सुमारास दोन्ही गट आमनेसामने आले. शाब्दिक वादानंतर परिस्थिती चिघळली आणि काही आरोपींनी गोळीबार केला. प्राथमिक माहितीनुसार, या घटनेदरम्यान सुमारे तीन ते चार राऊंड गोळीबार करण्यात आला. गोळीबारात राहुल वर्मा गंभीर जखमी झाला. घटनेनंतर परिसरात मोठी गर्दी जमली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच कल्याण विभागाचे पोलिस उपायुक्त (डीसीपी) अतुल झेंडे आणि सहाय्यक पोलिस आयुक्त (एसीपी) अशोक होनमाने यांनी घटनास्थळी धाव घेतली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कोळशेवाडी पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. पोलिसांनी चार संशयित आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांची परिसरातून धिंड काढण्यात आली. सध्या या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून गोळीबारामागील नेमके कारण, वापरण्यात आलेली शस्त्रे आणि इतर संबंधित आरोपींचा शोध घेतला जात आहे. दरम्यान या तरुणांकडे दहशत माजवण्यासाठी शस्त्र साठा येतो कुठून आणि यांना परवाना देतं कोण? हा मुद्दा उपस्थित केला जात आहे. दरम्यान या गुंडशाहीची पायमुळे खणून काढण्याची मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे. पोलीस या आरोपींवर काय कारवाई करणार हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## 25 वर्षीय महिलेनं आयुष्य संपवलं; गुन्हा दाखल

**मुंबई :** वय वर्ष अवघे २५. तीन वर्षांपूर्वी लग्न झालं. सुखी संसाराची स्वप्ने रंगवली. लग्नानंतर सुरुवातीचे काही महिने आनंदात गेले. तिच्या सुखी संसाराला हुंडारुपी वाळवीची नजर लागली. शेतीची कामे आणि कार खरेदीसाठी सुरू झाला अगणित, असह्य छळ. साताजन्माची साथ देणारा पती आणि सासू, सासऱ्यांनी पैशांसाठी मानसिक आणि शारिरीक छळ सुरू केला. सततचा त्रास आणि नेहमीचीच शिवीगाळ. अखेर वैतागून २५ वर्षांच्या विवाहितेनं जीवनयात्रा संपवली. शेततळ्यात उडी मारून तिनं आत्महत्या केली. या प्रकरणी येवला तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. नाशिकच्या येवला तालुक्यात वाघाळे येथे ही दुर्दैवी घटना घडली. हुंड्यासाठी सासरच्यांकडून होत असलेल्या छळाला कंटाळून २५ वर्षीय विवाहित महिला वैशाली नवले हिने शेततळ्यात उडी मारून आत्महत्या केली. या प्रकरणी येवला तालुका पोलीस ठाण्यात तिचा पती, सासरा आणि सासू यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शरद रामचंद्र निकुळे यांनी येवला तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## अनैतिक संबंधातून महिलेचे भयंकर कृत्य, ७ महिन्याच्या मुलाची गळा दाबून हत्या

**मेरठ/वृत्तसंस्था**




उत्तर प्रदेशच्या मेरठमध्ये भयंकर हत्याकांडाची घटना घडली. आईने आपल्या सात महिन्यांच्या मुलाची हत्या केली. ही घटना मुंडाली परिसरात घडली. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. धक्कादायक बाब म्हणजे, महिलेने आपल्या सासरच्यांच्या हत्येचा देखील कट रचला होता. प्रियकराच्या मदतीने हे भयंकर कृत्य केले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी महिलेला अटक केली. पोलिस त्याची चौकशी करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मिनाक्षी असं आरोपी महिलेचे नाव आहे. या महिलेने आपल्या सात महिन्यांच्या मुलाची गळा दाबून हत्या केली. तिने आपला दुसरा मुलगा, नवरा आणि सासरच्यांना संपवण्याचा कट रचला होता. मुलाचा आजारपणामुळे मृत्यू झाल्याचा दावा तिने केला होता. त्यामुळे कुटुंबीयांनी मुलावर अंत्यसंस्कार केले. त्याचा मृतदेह त्यांनी जमिनीत पुरला. पोलिस आता तो मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवणार आहेत. मुरलीपूर गावातील रहिवासी अमित तोमर यांनी आपल्या सात महिन्यांच्या रुद्रांश या मुलाच्या हत्येचा आरोप पत्नी मीनाक्षीवर केला. त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानंतर मीनाक्षीला पोलिसांनी ताब्यात घेऊन तिची चौकशी केली. पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, मीनाक्षीने आपल्या मुलाची गळा दाबून हत्या केली आणि नंतर त्याचा मृत्यू आजारपणामुळे झाल्याचा सांगितले होते. पण पोलिस चौकशीदरम्यान तिने आणखी धक्कादायक कबुली दिली.

तिने संपूर्ण कुटुंबीयांना संपवण्याचा कट रचला होता. मीनाक्षी आणि तिच्या प्रियकराने दुसऱ्या मुलाची आणि अमितसह सासरच्या इतर सर्वांची हत्या करण्याचा कट रचला होता. ते सर्वांना विष देऊन मारण्याचा प्लान करत होते. पोलिसांनी मिनाक्षी आणि तिच्या प्रियकराविरोधात गुन्हा दाखल केला. मिनाक्षीला पोलिसांनी अटक केली.

## बीडमध्ये कॉलेजच्या कर्मचाऱ्याचे अपहरण, निर्जनस्थळी नेत बेदम मारहाण

**बीड/वृत्तसंस्था**




बीड जिल्ह्यातील परळी शहरात एका धक्कादायक घटनेने खळबळ उडाली आहे. महिला महाविद्यालयातील एका कर्मचाऱ्याचे राहत्या घरातून अपहरण करून त्याला निर्जन ठिकाणी नेऊन अमानुष मारहाण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात आरोपीसह दोन अज्ञात साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनिल बाबुराव पत्की हे परळी येथील महिला महाविद्यालयात लिपिक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे आरोपी वैजनाथ यादव याच्यासोबत मागील काही वर्षांपासून पैशांचे व्यवहार सुरू होते. या व्यवहारातूनच हा प्रकार घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. ९ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास वैजनाथ यादव हा अनिल पत्की यांच्या घरी आला. आर्थिक व्यवहाराबाबत चर्चा करण्याच्या बहाण्याने त्याने पत्की यांना आपल्या दुचाकीवर बसवून कॉलेज रोड, काळरात्री मंदिर परिसर आणि धारावती भागाकडे नेले. त्यानंतर नदीपलीकडील एका निर्जन ठिकाणी गाडी थांबवण्यात आली. यावेळी तेथे आरोपीचे आणखी दोन अज्ञात साथीदार मोटारसायकलवरून आले. तिघांनी मिळून पत्की यांच्याकडे पैशांची मागणी करत शिवीगाळ सुरू केली. पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकी देत आरोपींनी लाकडी काठी आणि बेल्टने त्यांच्या पाठीवर, डोक्यावर आणि पायांवर बेदम मारहाण केली. तसेच या घटनेची माहिती कोणाला दिली किंवा पोलिसांत तक्रार केली तर जिवंत ठेवणार नाही, अशी धमकीही दिली.

मारहाणीनंतर आरोपींनी अनिल पत्की यांना दुपारपर्यंत डांबून ठेवले. त्यानंतर त्यांना सोडून आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. घाबरलेल्या अवस्थेत पत्की यांनी ही घटना आपल्या नातेवाईकांना सांगितली. त्यानंतर त्यांनी रुग्णालयात उपचार घेतले आणि परळी शहर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरून अपहरण, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला असून आरोपींचा शोध घेण्यासह पुढील तपास सुरू आहे.

# डीएलएस पद्धतीमुळे भारताच्या पदरी पराभव

## ट्राय सीरिजच्या दुसऱ्या सामन्यात अफगाणिस्तान-अ चा ४ धावांनी विजय..



■ कोलम्बो/वृत्तसंस्था

ट्राय सिरिजमध्ये भारताचा दूसरा गुरुवारी सामना पार पडला. भारत आणि अफगणिस्तान आमनेसामने आले होते. भारताने प्रथम फलंदाजी करताना अफगणिस्तानला ३५० रन्सचे टार्गेट दिले होते. वैभव सूर्यवंशी आणि प्रभसिमरन सिंहच्या खेळीने भारताने ३५० पर्यंत मजल मारली होती. मात्र अखेर या सामन्यात पावसामुळे अफ्गणिस्तानचा विजय झाला. ४ रन्सचे अफगणिस्तानने भारतावर विजय मिळवला. भारताने अफगणिस्तानला ३५० रन्सचे टार्गेट दिले होते. मात्र अफगणिस्तान फलंदाजी करण्यासाठी आला तेव्हा काही कालावधीनंतर पाऊस सुरु झाला. त्यामुळे ओव्हर्सची संख्या कमी करण्यात आली. या सामन्यात डीएलएस मेथडमुळे अफगणिस्तानने भारतावर ४ रन्सने विजय प्राप्त केला.

अफगणिस्तान कडून इम्रान मीरने सर्वाधिक ८४ रन्सची आक्रमक खेळी केली. तर बाहिर शहने ५१ रन्सची अर्धशतकी खेळी केली. मात्र पावसामुळे ओव्हर्स कमी करण्यात आल्या आणि अफगणिस्तानचा विजय झाला आहे. भारताकडून अरशद खान आणि अनुकूल रॉयने प्रत्येकी एक एक विकेट घेतली. अफगणिस्तानविरुद्ध वैभव सूर्यवंशीने लहानशी पण आक्रमक खेळी केली. त्याने २२ बॉलमध्ये ४४ रन्सची तुफानी खेळी केली. त्याला प्रभसिमरन सिंहने ८४ रन्सची चांगली साथ दिली. मागील सामन्यात श्रीलंकेविरुद्ध वैभव सूर्यवंशी १४ रन्सवर आउट झाला होता. दुसऱ्या सामन्यात वैभव सूर्यवंशीने अत्यंत संयमी आणि महत्वाची खेळी केली. वैभव सूर्यवंशी आउट झाला तेव्हा भारताचा स्कोअर ७४ रन्सवर होता. मागील सामन्यात चांगली खेळी करणाऱ्या ऋतुराज गायकवाडने या सामन्यात अर्धशतकी खेळी केली. त्याने ६६ रन्सची खेळी केली. सुयश शेडगेने ४० रन्सची खेळी केली.

### इम्रान - बहिर यांच्यात १०८ धावांची अभेद्य भागीदारी

■ कठीण प्रसंगी कर्णधार इम्रान मीर आणि बहिर शाह यांनी संघाची धुरा सांभाळली. या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी १०८ धावांची अभेद्य भागीदारी केली. इम्रान मीरने ७० चेंडूत ६ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद ७५ धावांची खेळी केली, तर बाहिर शाह ५२ चेंडूत ५१ धावांवर नाबाद राहिला.

# नेमबाजी कोच जसपाल राणा यांचं ४९व्या वर्षी आकस्मिक निधन; मनू भाकेरच्या यशात होता वाटा

■ पॅरिस/वृत्तसंस्था

भारतीय नेमबाजी विश्वातून अत्यंत दुःखद बातमी समोर आली आहे. प्रसिद्ध नेमबाजी प्रशिक्षक आणि माजी आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते जसपाल राणा यांचे शुक्रवारी वयाच्या ४९व्या वर्षी निधन झालं. सध्या भारताच्या पिस्तूल नेमबाजांच्या प्रशिक्षकाची जबाबदारी सांभाळत असलेल्या राणा यांना जर्मनीतील म्युनिक येथे झालेल्या ISSF World Cup स्पर्धेनंतर भारतात परतताना अचानक अस्वस्थ वाटू लागल्याची माहिती समोर आली, त्यानंतर त्यांचं निधन झालं.



भारतीय नेमबाजीला अनेक आंतरराष्ट्रीय यश मिळवून देण्यात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या जसपाल राणा यांच्या निधनामुळे क्रीडा विश्वावर शोककळा पसरली आहे. भारताच्या पिस्तूल नेमबाजांचे हाय-परफॉर्मन्स प्रशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या राणा यांना जर्मनीतील म्युनिक येथे झालेल्या ISSF World Cup स्पर्धेनंतर भारतात परतताना अस्वस्थ वाटू लागलं. नवी दिल्लीत पोहोचल्यानंतर त्यांना साकेत येथील मॅक्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू होते.

पण नंतर नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडियाने त्यांच्या निधनाची अधिकृत माहिती दिली आहे. जसपाल राणा यांच्या निधनाने भारतीय नेमबाजी विभागाला मोठा धक्का बसला आहे. खेळाडू आणि प्रशिक्षक या दोन्ही भूमिकांमधून त्यांनी तीन दशकांहून अधिक काळ भारतीय नेमबाजीसाठी मोलाचं योगदान दिलं होतं. त्यांच्या जाण्याने भारतीय क्रीडा विश्वाने एक महान नेमबाज आणि प्रेरणादायी मार्गदर्शक गमावला आहे. खेळाडू म्हणून कारकिर्दीनंतर प्रशिक्षक म्हणून जसपाल राणा यांच्या कारकिर्दीतील सर्वात महत्वाच्या अध्यायांपैकी एक म्हणजे मनू भाकेर हिच्यासोबतची त्यांची जुळले यशस्वी भागीदारी. मनूच्या कारकिर्दीतील अत्यंत महत्वाच्या टप्प्यात राणा यांनी तिच्या तयारीत आणि कौशल्यविकासात मोलाची भूमिका बजावली होती. पुढे मनू भाकेरने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये इतिहास घडवला. तिने महिला १० मीटर एअर पिस्तूल आणि मिश्र सांघिक १० मीटर एअर पिस्तूल या दोन्ही प्रकारांत कांस्यपदक जिंकत भारतीय क्रीडा इतिहासात आपलं नाव नोंदवलं.

# ऑस्ट्रेलिया संघात निखिल चौधरीची निवड





■ कॅनबेरा/वृत्तसंस्था

भारतात जन्मलेला अष्टपैलू निखिल चौधरीची पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियाच्या टी-२० संघात निवड झाली आहे. तो बांगलादेशविरुद्धच्या ३ टी-२० सामन्यांच्या मालिकेत सहभागी होईल. ३० वर्षीय निखिलला ट्रॅव्हिस हेडच्या जागी संघात समाविष्ट करण्यात आले आहे. हेडला विश्रांती देण्यात आली आहे. पंजाबसाठी देशांतर्गत क्रिकेट खेळलेला निखिल २०२० मध्ये कोविड-१९ महामारीदरम्यान ऑस्ट्रेलियात पोहोचला होता. तेथे त्याने ग्रेड क्रिकेट, टास्मानिया आणि होबार्ट हरिकेन्ससाठी उत्कृष्ट कामगिरी करून आपली ओळख निर्माण केली. बांगलादेश दौऱ्यावर त्याला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची संधी आहे. टी-२० मालिका १७ जूनपासून सुरू होईल.

ऑस्ट्रेलियाचे निवडकर्ते टोनी डोडेमाइड म्हणाले की, निखिल बऱ्याच काळापासून राष्ट्रीय संघाच्या संभाव्य खेळाडूंच्या यादीत होता. निवडकर्ते त्याच्या बिग बॅश आणि देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरीने प्रभावित झाले आहेत. निखिलकडे सध्या ऑस्ट्रेलियन नागरिकत्व नाही, परंतु आयसीसीच्या निवासविषयक नियमांची पूर्तता केल्यामुळे तो ऑस्ट्रेलियासाठी खेळण्यास पात्र आहे.

# श्रीलंका दौऱ्यासाठी भारताचा अंडर-१९ संघ जाहीर

## एकदिवसीय व बहुदिवसीय मालिकेसाठी दोन संघाची घोषणा

■ मुंबई/वृत्तसंस्था

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या ज्युनियर क्रिकेट समितीने गुरुवारी श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय आणि बहुदिवसीय सामन्यांसाठी भारतीय १९ वर्षांखालील संघाची घोषणा केली. दोन्ही मालिकांसाठी स्वतंत्र १५ सदस्यीय संघ जाहीर करण्यात आले आहेत. पहिली मालिका तीन एकदिवसीय सामन्यांची असेल, तर त्यानंतर दोन बहुदिवसीय म्हणजेच मल्टी-डे सामन्यांची मालिका खेळवली जाईल. भारताचे माजी खेळाडू आणि माजी मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा धाकटा मुलगा अन्वय द्रविड याचीही एकदिवसीय मालिकेच्या संघात निवड झाली आहे. भारतीय १९ वर्षाखालील संघाचा श्रीलंका दौरा ४ जुलैपासून सुरू होईल, ज्यासाठी यशवर्धन सिंग चौहानची संघाचा कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

श्रीलंका दौऱ्याची सुरुवात एकदिवसीय मालिकेने होईल. पहिला सामना ४ जुलै रोजी, तर दुसरा सामना ६ जुलै रोजी खेळला जाईल. तिसरा आणि अंतिम एकदिवसीय सामना ९ जुलै रोजी खेळला जाईल. हे तिन्ही सामने हंबनटोटा या एकाच ठिकाणी आयोजित केले जातील. यानंतर १३ ते १६ जुलै दरम्यान गॉल येथे पहिला मल्टी- डे सामना होईल. दुसरा बहुदिवसीय सामना २० ते २३ जुलै दरम्यान कोलंबो येथे खेळला जाईल.

**एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय १९ वर्षांखालील संघ**

सागर विर्क, लक्ष्य रायचंदानी (उपकर्णधार), यशवर्धन सिंग चौहान (कर्णधार), विनीत व्हीके, अर्जुन राजपूत, कुशाग्र ओझा, रजत बघेल (यष्टीरक्षक), अन्वय द्रविड (यष्टीरक्षक), अनमोलजीत सिंग, वुटकुरी यशवीर गौड, रोहित अनिल यादव, शाविन वी, काव्या परेश पटेल, मोहित उलवा, इशान सूद.

**बहु-दिवसीय सामन्यांसाठी भारतीय अंडर १९ संघ**



सागर विर्क, लक्ष्य रायचंदानी (उपकर्णधार), यशवर्धन सिंग चौहान (कर्णधार), पटेल कुश, मनाल चौहान, कुशाग्र ओझा, मानव कृष्णा (यष्टीरक्षक), आर्यन संदेश सकपाळ (यष्टीरक्षक), हेमचुदेशन जे, बीके किशोर, रोहित, रोहित अनिल यादव, काव्या परेश पटेल, प्रियांशु सिंग, प्रणव राघवेंद्र, चिगुरुपती व्यंकट.

# “मालिका बंद होईल आणि त्याच आठवड्यात”, मालिकेबाबत अमोल कोल्हेंचा ठाम निर्धार

अभिनेते आणि खासदार डॉ. अमोल कोल्हे तसेच मधुराणी प्रभुलकर यांची मुख्य भूमिका असलेली 'मी सावित्रीबाई जोतीराव फुले' ही मालिका येत्या १४ जून रोजी प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. अवघ्या पाच महिन्यांतच ही मालिका अचानक बंद होत असल्याने सोशल मीडियावरून प्रेक्षकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वाहिनीच्या या निर्णयावर आता डॉ. अमोल कोल्हे यांनी प्रतिक्रिया दिली असून, एक मोठा आणि ठाम निर्धार जाहीर केला आहे.

या संदर्भात डॉ. अमोल कोल्हे यांनी सोशल मीडियावर आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, “१४ जूनला मालिका बंद होईल; पण त्याच आठवड्यात मी ही मालिका पुन्हा सुरू करणार, हे तुम्हाला ठामपणे सांगतो. सध्या मला माध्यम माहिती नाही, पैसा कसा उभा राहील हेही स्पष्ट नाही. मला काहीच माहिती नाही. मला फक्त एवढंच माहीत आहे की, जर हा देश वाचवायचा असेल तर या देशाला वैचारिक भूमिका देण्याचं



काम महाराष्ट्राने केलंय.”

ते पुढे म्हणाले, “महाराष्ट्र पुढे न्यायचा असेल, तर त्याची वैचारिक बैठक पुन्हा एकदा मजबूत करावी लागेल. त्यामध्ये खारीचा वाटा का होईना, जर या माध्यमातून उचलला जात असेल तर नक्कीच माझी तयारी आहे.”

आजच्या तरुणाईच्या सामाजिक आणि वैचारिक बैठकीवरही अमोल कोल्हे यांनी प्रहार केले. ते म्हणाले, “Gen Z विषयी सगळे बोलतात. तरुणाईकडून सगळ्यांच्याच अपेक्षा आहेत. पण महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, या तरुणाईचा वैचारिक पिंड तसा पोसला आहे का? त्यांची वैचारिक बैठक तशा पद्धतीने तयार केली गेली आहे का? आणि जर ती तयार झाली नसेल, जर ती अर्धवट आणि कच्ची असेल, तर तिला घडवण्याची, त्यांच्यावर संस्कार करण्याची जबाबदारी कोणाची आहे? हा महाराष्ट्र धर्म जागवण्याची जबाबदारी कोणाची आहे? एवढंच फक्त चिंतन करणं आजच्या परिस्थितीत गरजेचं आहे!”, असंही ते म्हणाले.

जानेवारी महिन्यात सुरू झालेली ही मालिका अवघ्या १५२ भागांत गुंडाळली जात असल्याने कोल्हेंनी यापूर्वीही खंत व्यक्त केली होती. “मालिका इतक्या लवकर संपणे दुर्दैवी आहे, पण ही गोष्ट थांबणार नाही. एका वेगळ्या मंचावर प्रेक्षकांना हा इतिहास पाहायला मिळेल,” असा विश्वास त्यांनी दिला होता.

टीआरपी रेटिंगवर उघडपणे बोलताना ते 'मुंबई टाइम्स'शी म्हणाले, “ज्या मालिकांना टीआरपीच्या मोजपट्टीत बसवलं जातं, त्यांच्या 'अर्काइव्ह व्हॅल्यू'चा (संग्रहणीय मूल्य) विचारही केला पाहिजे. 'राजा शिवछत्रपती' ही मालिका आज एका वेगळ्या वाहिनीवर यशस्वीपणे दाखवली जातेय. 'स्वराज्यरक्षक संभाजी' मालिकाही अनेक भाषांमध्ये डब झाली. आज अनेक प्रेक्षक दैनंदिन मालिका वाहिनीच्या ओटीटी (OTT) प्लॅटफॉर्मवर पाहतात. परंतु, टीआरपी फक्त संध्याकाळी टीव्हीवर प्रसारित होणाऱ्या भागांचाच मोजला जातो. त्यामुळे टीआरपीचं कारण हे माझ्यामते अर्धसत्य आहे.”

सावित्रीबाई फुले आणि जोतीराव फुले यांचा संघर्षमय जीवनप्रवास, त्यांचे विचार आणि त्यांनी शिक्षणासाठी दिलेला ऐतिहासिक लढा या मालिकेत प्रभावीपणे मांडण्यात आला होता. या मालिकेत मधुराणी प्रभुलकर आणि डॉ. अमोल कोल्हे यांच्यासोबतच राजसी भावे आणि अभिषेक देशमुख यांनीही महत्त्वाच्या भूमिका साकारल्या होत्या. दरम्यान, वाहिनीवरून निरोप घेतल्यानंतर आता ही मालिका नक्की कोणत्या नव्या माध्यमावर किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रेक्षकांच्या भेटीस येणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## ख़ुशी हजारे या मराठमोळ्या चिमुरडीने साकारली छोटी आलिया भट्ट

बॉलीवूडच्या बहुचर्चित व बहुप्रतीक्षित 'अल्फा' चित्रपटाचा टीझर आऊट झाला आहे. अभिनेत्री आलिया भट्ट हिची प्रमुख भूमिका असलेला चित्रपट जोरदार चर्चेमध्ये आला. ॲक्शन, थ्रिलर असलेल्या अल्फा चित्रपट एक स्पाय युनिव्हर्स असणार आहे. त्यामध्ये आलियासह बॉबी देओल, अनिल कपूर व शर्वरी वाघ यांच्या प्रमुख भूमिका आहेत. 'अल्फा' चित्रपटाच्या टीझरमधून महिला गुप्तहेराचे मिशन आणि हाय-ऑक्टेन ॲक्शन थरार पाहायला मिळत आहे. टीझरमधील आलिया भट्टच्या खास लूक व ॲक्शन सीन्सचे कौतुक होत असले तरी आणखी एका कलाकाराने लक्ष वेधले आहे, ती म्हणजे मराठमोळी बालकलाकार खुशी हजारे.

हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय बालकलाकार खुशी हजारे हिच्या अभिनयाचा मोठा चाहतावर्ग आहे. खुशीने अनेक चित्रपट व मालिकांमध्ये बालकलाकार म्हणून भूमिका साकारल्या आहेत. त्यामध्ये तिचा सर्वांत जास्त गाजलेला चित्रपट 'वेड'. रितेश देशमुख यांनी दिग्दर्शित केलेल्या 'वेड' चित्रपटामध्ये खुशीने जिया शंकर अर्थात निशाच्या मुलीचे पात्र साकारले होते.

'वेड' या चित्रपटातील तिची भूमिका लक्षवेधी ठरली होती आणि तिच्या अभिनयाचे प्रचंड कौतुक करण्यात आले. 'वेड'मधील अभिनयासाठी खुशीला 'फिल्मफेअर मराठी सर्वोत्कृष्ट बालकलाकार पुरस्कार' मिळाला होता. या भूमिकेमुळे चर्चेत आलेली मराठी बालकलाकार खुशी हजारेने 'अल्फा'मध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे. खुशी हजारे हिने 'अल्फा' या चित्रपटामध्ये आलिया भट्टच्या लहानपणीचे पात्र साकारले आहे.

'अल्फा'च्या टीझरमध्ये खुशी खास लूकमध्ये दिसून येत असून, गुप्तहेर बनण्यासाठी ट्रेनिंग घेत असल्याचे दिसत आहे. बॉबी देओलने आलियाच्या वडिलांचे पात्र साकारले आहे.



## अमिताभ बच्चन यांनी का केले आलिया भट्टचे कौतुक ? सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल

यश राज फिल्मच्या 'अल्फा' चित्रपटाचा टीझर आऊट झाला आहे. आलिया भट्ट आणि बॉबी देओल यांची प्रमुख भूमिका असलेल्या 'अल्फा'च्या टीझरला प्रेक्षकांची पसंती मिळत आहे. अवघ्या काही तासांमध्ये ४ मिलियनहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. ॲक्शन, थ्रिलर असलेला हा चित्रपट एक 'स्पाय युनिव्हर्स' असणार आहे. यामध्ये आलिया भट्ट ही ॲक्शन सीन करताना दिसत आहे. तिचा वेगळाच अंदाज टीझरमध्ये दिसून आला आहे. आलिया भट्टच्या 'अल्फा' चित्रपटाचे महानायक अमिताभ बच्चन यांनी कौतुक केले आहे. 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर त्यांनी पोस्ट केली आहे.

अभिनेत्री आलिया भट्ट ही तिच्या आगामी ॲक्शन स्पाय युनिव्हर्स 'अल्फा'मुळे चर्चेत आहे. मागील अनेक दिवसांपासून प्रेक्षक टीझरची आतुरतेने वाट पाहत होते. टीझर आऊट झाल्यानंतर आलियाचा लूक आणि अभिनयाचे तसेच तिच्या ॲक्शन सीनचे कौतुक होत आहे. याचदरम्यान, अमिताभ बच्चन यांनी आलिया भट्टसाठी केलेल्या खास पोस्टने लक्ष वेधून घेतले आहे. अमिताभ बच्चन यांनी लिहिलं, “माझ्या लाडक्या आलिया भट्टला खूप प्रेम आणि शुभेच्छा.” तसेच त्यांनी अल्फा चित्रपटाचा टीझरदेखील शेअर केला आहे. तसेच चित्रपटातील सर्व कलाकार व दिग्दर्शकांना टॅग केले आहे. 'अल्फा' चित्रपटामध्ये आलियासह, शर्वरी



वाघ, बॉबी देओल आणि अनिल कपूर यांच्या प्रमुख भूमिका असणार आहेत. चित्रपटामध्ये बॉबी देओलने आलियाच्या वडिलांचे पात्र साकारले आहे.

अमिताभ बच्चन यांनी आलिया भट्टचे कौतुक करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी अनेकदा बिग बी यांनी आलियाच्या कामाचे कौतुक केले आहे. २०१५ साली दिलेल्या एका मुलाखतीमध्ये आलियाने, तिला भविष्यात डान्स किंवा अभिनय शिकवणारी शिक्षिका व्हायला आवडेल,' असं म्हटलं होतं. यावर अमिताभ बच्चन यांनी 'असे असेल तर, मला तुमचा विद्यार्थी व्हायला आवडेल', अशी प्रतिक्रिया दिली होती.'यश राज फिल्म्स'ची निर्मिती असलेल्या 'अल्फा' या चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटाची निर्मिती आदित्य चोप्रा यांनी केली असून, शिव रवैल यांनी दिग्दर्शन केले आहे. येत्या ३ जुलै २०२६ रोजी 'अल्फा' चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटातील 'स्पाय युनिव्हर्स'मध्ये एका तरुणीची थरारक गोष्ट मांडण्यात आली आहे. त्या तरुणीला लहानपणापासून एक मिशनचे ट्रेनिंग दिले जात असून, तिचे संगोपन हत्या करण्यासाठी झाले आहे, असं टीझरमध्ये दाखवलंय. 'अल्फा' हा स्त्री पात्रांवर आधारित रोमांचक ॲक्शन चित्रपट आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आमदार चैनसुख संचेती- सभापती संजय काजळेंशी चर्चा झालीय म्हणत नोकरीचा सौदा?

# मलकापूरात ११ लाखांच्या फसवणुकीने खळबळ!

**जनसंचलन/बुलढाणा**

शहरात नोकरीच्या नावाखाली तब्बल ११ लाख ०३ हजार ५४० रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, मलकापूर येथे क्लर्क आणि शिपाई पदे रिक्त असून ओळखीतून नोकरी लावून देतो, असे आमिष दाखवत पैसे उकळल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. या प्रकरणी अरविंद मनोहर किनगे, वय ३९, रा. चाळीसविधा, मलकापूर याच्याविरुद्ध मलकापूर शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार सचीन अशोक पाचपोर, वय ३४, रा. धरणगाव, ता. मलकापूर यांनी दिलेल्या जबाबानुसार, त्यांच्या मित्रामार्फत अरविंद किनगे याची ओळख झाली. किनगे याने कृषी उत्पन्न बाजार समितीत क्लर्कची तीन पदे रिक्त असल्याचे सांगून, ङ्गमाझा मोठा परिचय आहे, याआधीही अनेकांना नोकरी लावली आहे,ङ्ग असा विश्वास दिला. इतकेच नव्हे तर भाजप आमदार चैनसुख संचेती आणि कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती संजय काजळे




यांच्याशी चर्चा झाल्याचे नाव घेऊन प्रत्येकी आठ लाख रुपये लागतील, त्यापैकी प्रत्येकाकडून चार लाख रुपये आधी द्यावे लागतील, असे सांगितल्याचा आरोप तक्रारीत आहे. यानंतर सचीन पाचपोर, गणेश विष्णू वैतकर आणि वैभव गजानन कात्रे यांनी फोन पे, आरटीजीएस आणि इतर व्यवहारांद्वारे एकूण ११ लाख ९८ हजार ०४० रुपये दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. मात्र २० जानेवारी २०२६ पर्यंत नोकरीबाबत कोणतीही हालचाल न झाल्याने पैसे परत मागितले असता आरोपीने टाळाटाळ सुरू केली. पुढे धमक्या देत पत्नीच्या नावाने महिला आयोगात तक्रार करीन, सावकारीची खोटी तक्रार करीन, गुंड लोकांकडून काटा काढीन, अशा धमक्या दिल्याचा गंभीर आरोपही तक्रारदाराने केला आहे. दबाव वाढल्यानंतर आरोपीने काही रक्कम परत दिली. तक्रारीनुसार ९४ हजार ५०० रुपये परत मिळाले. तसेच १० लाख, ३.५० लाख आणि ३.५० लाख रुपयांचे चेक देण्यात आले; मात्र सह्या चुकीच्या आणि नाव नसल्याने ते चेक वटले नाहीत. त्यामुळे उर्वरित ११ लाख ०३ हजार ५४० रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार करण्यात आली. या प्रकरणात पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आदेशानंतर आणि प्राथमिक चौकशीतील कागदपत्रांच्या आधारे मलकापूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनि पाटील यांच्याकडे देण्यात आला आहे. आता या प्रकरणात आरोपीने घेतलेल्या राजकीय नावांचा खरा संबंध आहे की केवळ नोकरीच्या आमिषासाठी मोठ्या नावांचा वापर करण्यात आला, याकडे संपूर्ण मलकापूरचे लक्ष लागले आहे.

## पत्रकारांना धमकी देणाऱ्या खासदारावर गुन्हा दाखल करा; चिखली तालुका पत्रकार संघ आक्रमक, आंदोलनाचा इशारा!

**जनसंचलन/चिखली**

लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारांना शिवीगाळ करून मारहाणीची उघड धमकी देणाऱ्या ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांच्याविरोधात पत्रकार संरक्षण कायद्यान्वये तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी चिखली तालुका पत्रकार संघ आक्रमक झाला आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ अंतर्गत चिखली तालुका पत्रकार संघाच्या वतीने शुक्रवारी, २६ जून रोजी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना चिखली पोलीस स्टेशनमार्फत निवेदन देण्यात आले. खासदार संजय दिना पाटील यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी त्यांच्या वादग्रस्त विधानाबाबत स्पष्टीकरण विचारले असता पत्रकारांना अर्वाच्य शिवीगाळ केली. एवढेच नव्हे तर ङ्गपुन्हा विचारायला आलात तर मारून पाठवीनङ्ग अशी थेट धमकी दिल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. हा प्रकार




केवळ एका पत्रकाराचा अपमान नसून संपूर्ण पत्रकारितेवर, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आणि लोकशाही व्यवस्थेवर हल्ला असल्याची तीव्र भावना पत्रकारांमध्ये व्यक्त होत आहे. पत्रकारांना निर्भयपणे काम करता यावे यासाठी अस्तित्वात असलेल्या पत्रकार संरक्षण कायद्यानुसार संबंधित खासदाराविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा चिखली तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष नितीन फुलझाडे यांनी दिला. ङ्गपत्रकारांना धमकावणाऱ्यांना राजकीय पाठबळ मिळू नये. गुन्हा दाखल झाला नाही तर आंदोलनाची जबाबदारी शासन व प्रशासनाची राहील,ङ्ग असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार संतोष लोखंडे, कैलास गाडेकर, रमाकांत कपूर, रविंद्र फोलाने, इफ्तेखार खान, महेश गोंधणे, छोटु कांबळे, भरत जोगदंडे, रमिझ राजा, कमलाकर खेडेकर, योगेश शर्मा, सय्यद साहिल, राजेश बिडवे, किरण शेजोळ, ऋषि भोपळे यांच्यासह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बुलडाण्यात शेळीपालन, कुक्कुटपालन व गाय-म्हैस पालन प्रशिक्षणाचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) यांच्या वतीने जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणा यांच्या माध्यमातून उद्योग-व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी शेळीपालन, कुक्कुटपालन तसेच गाय-म्हैस पालन या विषयांवरील पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दि. २ जुलै ते ६ जुलै २०२६ या कालावधीत बुलढाणा येथे होणार आहे. सुशिक्षित बेरोजगारांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वयंरोजगाराच्या माध्यमातून स्वतःचा उद्योग उभारावा, हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. प्रशिक्षणामध्ये शेळीपालन, कुक्कुटपालन आणि गाय-म्हैस पालनाचे आधुनिक तंत्रज्ञान, विविध जातींची माहिती, लसीकरण, रोग व त्यांची लक्षणे, पशुखाद्य निर्मिती, चाऱ्याचे प्रकार, उद्योग उभारणीसाठी आवश्यक मार्गदर्शन, उद्योजकता विकास, उद्योग संधी, शासकीय योजनांची माहिती तसेच व्यवसायासाठी आवश्यक सहकार्य याविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी अर्ज करणारा उमेदवार किमान ५ वी उत्तीर्ण आणि १८ वर्षे वयाचा असावा. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या सहभागींना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. प्रशिक्षणासाठी नोंदणी, शुल्क तसेच अधिक माहितीसाठी इच्छुकांनी दि. २ जुलै २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत श्री. गणेश गुप्ता, प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी), जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालयाजवळ, चिखली रोड, बुलढाणा येथे संपर्क साधावा. तसेच मो. ९०११५७८८५४ / ८२७५०९३२०१ या क्रमांकावरही संपर्क साधता येईल. या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन स्वयंरोजगाराच्या दिशेने पाऊल टाकण्याचे आवाहन श्री. किशोर अंभोरे, विभागीय अधिकारी, एमसीईडी, अमरावती यांनी केले आहे.

# क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या लढवय्या शिलेदारांची तुपकरांनी रुग्णालयातूनच घेतली ऑनलाईन बैठक!

## शब्द पाळा... नाहीतर सरकारला झोप लागू देणार नाही! रुग्णालयातूनच तुपकरांचा इशारा, कर्जमुक्तीच्या लढ्याचा प्लॅन बी तयार!

जनसंचलन-बुलढाणा

शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमुक्तीचा लढा आता निर्णायक टप्प्यात पोहोचला असून, सरकारने दिलेला शब्द पाळला नाही तर राज्यभर सरकारची भंबेरी उडवणारे आंदोलन उभारले जाईल, असा स्पष्ट आणि आक्रमक इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी दिला आहे. अन्नत्याग आंदोलनामुळे प्रकृती खालावून छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचार घेत असतानाही तुपकर यांनी राज्यभरातील क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांशी ऑनलाइन संवाद साधत पुढील लढ्याचा आराखडा तयार केला. या बैठकीत कर्जमुक्ती आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार करण्यात आला. तुपकर म्हणाले की, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी उभारलेल्या अन्नत्याग आंदोलनाला राज्यभरातून मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादामुळेच सरकारला झुकावे लागले. सरकारने कर्जमुक्ती आणि पीकविम्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. आता निर्णयाची वेळ आली आहे. सरकारने दिलेला शब्द पाळला नाही, तर पुढील आंदोलन अधिक व्यापक आणि सरकारला हादरवून सोडणारे असेल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. पाच दिवसांच्या अन्नत्याग आंदोलनामुळे तुपकर



यांची प्रकृती गंभीर झाली होती. त्यानंतर त्यांना प्रथम जिल्हा सामान्य रुग्णालयात आणि नंतर छत्रपती संभाजीनगर येथे उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र रुग्णालयाच्या बेडवरूनही त्यांनी आंदोलनाची सूत्रे हाती घेतली. बुधवारी रात्री त्यांनी राज्यभरातील प्रमुख शिलेदारांची ऑनलाइन बैठक घेत संघटनात्मक आढावा घेतला आणि पुढील रणनीतीवर सविस्तर चर्चा केली. बैठकीत सरसकट कर्जमाफी, पीकविमा, तसेच आगामी आंदोलनाच्या नियोजनावर चर्चा झाली. राज्यातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांनी आपली मते मांडली. सरकारने बैठकीसाठी काही दिवसांचा अवधी मागितला होता. आपणही आणखी चार-पाच दिवस संयम बाळगू; मात्र त्यानंतरही निर्णय झाला नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा तुपकर यांनी दिला. आतापर्यंतचा लढा महात्मा गांधींच्या अहिंसेच्या मार्गाने झाला. पण सरकारने विश्वासघात केला, तर पुढील आंदोलन शहीद भगतसिंगांच्या लढाऊ विचारांनी प्रेरित असेल. मी स्वतः मुंबईत येऊन आंदोलनाला बसेन. त्या आंदोलनातून राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, तर त्याची संपूर्ण जबाबदारी राज्य सरकारची असेल, असा थेट इशाराही तुपकर यांनी दिला. दरम्यान, क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या या ऑनलाइन बैठकीनंतर राज्यभरातील कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारल्याचे चित्र असून, सरकारच्या पुढील भूमिकेकडे आता संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. सरकार दिलेला शब्द पाळते की संघर्षाची नवी ठिणगी पडते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बुलढाणा जिल्ह्यात प्रथमच,,सम्यक समन्वय समितीच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त मिरवणुकीचे यशस्वी आयोजन.

जनसंचलन/बुलढाणा

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२व्या जयंती उत्सवानिमित्त बुलढाणा जिल्ह्यात प्रथमच सम्यक समन्वय समिती च्या वतीने भव्य मिरवणुकीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी माणगाव येथील परिषदेमध्ये घोषणा केली होती की एक वेळ माझा जन्मदिवस साजरा करू नका, पण राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती सणाप्रमाणे साजरी कराङ्कङ्क.सामाजिक, शैक्षणिक, शेती, अशा विविध क्षेत्रात अद्वितीय असे कार्य केलेले महान बहुजनवादी, लोकशाहीवादी आरक्षणाचे जनक,राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त सम्यक समन्वय समिती बुलढाणा च्या संपूर्ण टीम ने बुलढाणा शहरातील समस्त समविचारी संघटना, संस्था आणि बहुजनवादी,आंबेडकरवादी विचारधारेतील प्रतिष्ठित मंडळींना या मिरवणुकीमध्ये सहभाग घ्यावा म्हणून आमंत्रित केले होते. अल्पावधीत आयोजित केलेल्या या मिरवणुकीला शहरातील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मिरवणुकीचा प्रारंभ महापुरुषांचे पुतळे जयस्तंभ चौक येथून झाला. जयस्तंभ चौकातील राजमाता जिजाऊ साहेब, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फ ुले तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई यांच्या पुतळ्यांना पुष्प अर्पण करून यश सिद्धी सैनिक सेवा संघाच्या वतीने मानवंदना देऊन मिरवणूक मोठ्या शिस्तीने निघाली. ढोल ताशा पथक, लेझीम पथक, त्या पाठोपाठ यश सिद्धी सैनिक सेवा संघाचे जवान, छत्रपती शाहू महाराजांची प्रतिमा असलेला सुशोभित रथ, तदनंतर महिलावर्ग आणि पुरुषवर्ग असे मिरवणुकीचे स्वरूप होते. बहुजनवादी लोक राजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज की जय या घोषणांनी मिरवणुकीत चैतन्य आले होते. एसबीआय चौक मार्गे मिरवणूक आयडीबीआय चौक छत्रपती शाहू महाराजांचा पुतळा




येथे आली आणि छत्रपती शाहू महाराजांच्या पुतळ्याला सैनिकांची मानवंदना आणि मिरवणुकी मधील समस्त सहभागींनी अभिवादन केले आणि राष्ट्रगीताने मिरवणुकीचा समारोप झाला. अत्यंत शिस्तबद्ध आणि हर्षउल्हासात निघालेल्या या मिरवणुकीचे संपूर्ण शहरात कौतुक होत आहे. शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त अनेक कार्यक्रम होत असतात पण बुलढाणा जिल्ह्यात प्रथमच शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त मिरवणुकीचे आयोजन सम्यक समन्वय समिती बुलढाणाच्या वतीने करण्यात आले आणि हे आयोजन यशस्वीरित्या संपन्न झाले त्याकरिता सम्यक समन्वय समितीच्या संपूर्ण पदाधिकारी यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली.

# जिल्हाधिकारी कार्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी



जनसंचलन-बुलढाणा

जिल्हाधिकारी कार्यालयात राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस उपजिल्हाधिकारी राजेंद्र पोळ यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हा नाझर गजानन मोतेकर, कैलास राऊत, श्रीकृष्ण कुटे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक न्याय, शिक्षण प्रसार आणि बहुजन कल्याणासाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण करत त्यांना विनम्र अभिवादन केले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८